नोंदणी क्रमांक-रजि.नं.एफ १५४६
परभणी दि.२८.१०.१९९३

Shri Chatrapati Shivaji Shikshan Prasarak Mandal Goregaon

**Late Baburao Patil**
**Arts & Science College,**
**Hingoli.431513 (Maharashtra)**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गोरेगांव,संचलित
**कै. बाबुराव पाटील**
**कला व विज्ञान महाविद्यालय,**
**हिंगोली. 431513**

**Sr.College Code : 246**

Phone No. Offi. (02456)223998, 263033
स्थापना वर्ष - २००१
E-mail ID: lbpatilcollege_hingoli@ymail.com

**Shri. Ranjit Patil Goregaonkar** — President
**Shri.Bhaurao Patil Goregaonkar** — Secretary
**Dr.Jaywant S.Bhoyar** — Principal

जा.क्र. LBPatil.Coll.HNL/2020-21/200 दिनांक : 09/06/२०21

प्रति ,
मा. प्राचार्य साहेब,
आदर्श महाविद्यालय
हिंगोली

## आंतर ग्रंथालयीन देवान घेवाण करारपत्र

आम्ही खालील स्वाक्षरी करणारे आपसात करार करतो , की आंतर ग्रंथालयीन देवाण - घेवाण योजने अंतर्गत आम्ही तयार असुन या बाबतीचे नियम व शर्ती खालील प्रमाणे आम्हास लागू राहील व त्यांची पुर्तता करण्याची आम्ही या करारनामाद्वारे शाश्वती देत आहोत . महाविद्यालयीन ग्रंथालय देवाण - घेवाणसाठीचे नियम खालीलप्रमाणे राहतील.

१. या करारद्वारे महाविद्यायीन ग्रंथालयातुन ग्रंथालयीन वाचन साहित्य उदा . पुस्तके , संदर्भग्रंथ नियतकालीके, वृत्तपत्रे करण्यात Audio , Video , Material , CDs नकाशे व तसेच इतर वाचन साहित्याची देवाण - घेवाण एका विशिष्ठ मुदतीसाठी आपसात भाडे तत्वावर आदान प्रदान करण्यास आम्ही मान्य करीत आहेत.

२.आंतर ग्रंथालयीन देवाण - घेवाण पध्दत ही पुर्णतः निशुल्क असेल . परंतू वापरत असतांना वाचन साहित्याचे कांही नुकसान झाल्यास संबंधित ग्रंथालयास नुकसान भरपाई करुन द्यावी लागेल.

३. आंतर ग्रंथालयीन देवाण - घेवाण करार पध्दत ही पाच वर्षाच्या मुदतीसाठी राहिल. ( 2021 ते 2026 ) पाच वर्षानंतर एक एप्रिल किंवा नंतर हा करारांचा नुतीनीकरण करणे आवश्यक आहे.

४.ज्या ग्रंथालयाला वाचन साहित्याची आवश्यकता असेल त्याला ती स्वखर्चाने वापस करावा लागेल.

५. दुर्मीळ वाचन साहित्य ग्रंथालयात बसून त्यांचा उपयोग करावा लागेल . किंवा शक्य असल्यास संबंधीत ग्रंथपालांची परवानगी घेऊन त्यांची छायांकीत प्रती प्राप्त करता येईल व त्यासाठी येणारा खर्च हा गरजु ग्रंथालयास करावा लागेल .

६.ग्रंथालयीन साहित्याची देवाण - घेवाण ही फक्त महाविद्यालयाने किंवा ग्रंथालयाने प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्यामार्फत करता येईल अनअधिकृतीस व्यक्तीस वाटपास मनाई राहिल.

७. ग्रंथालयीन साहित्यांची कोणत्याही प्रकारची ईजा किंवा नूकसान होणार नाही . याची दक्षता गरजू ग्रंथालयास घ्यावी लागेल तसेच घेतलेल्या साहित्यांचा वापर काळजी पूर्वक करण्यास ग्रंथालय बाध्य राहतील .

८.घेतलेले साहित्य हे मुदतीत वापर करण्याची जबाबदारी गरजू ग्रंथालयांची राहिल . आवश्यकता असेल तर संबंधित मालकी असलेल्या ग्रंथालयाची परवाणगी घेऊन मुद्यत वाढ करुन घेता येईल.

९ . मुद्यतीपुर्वी आंतर ग्रंथालयीन देवाण - घेवाण करारनामा समाप्त करावयाचा असेल तर एक महिन्याची पुर्व सुचना देणे संबंधित ग्रंथालयाला आवश्यक राहिल.

१०.वरील प्रमाणे दिलेल्या अटी व शर्ती दोन्ही ग्रंथालयांना बंधनकारक राहतील . जर भविष्यात कोणत्याही ग्रंथालयाकडून अटीचा भंग झाल्यास संबंधित ग्रंथालय करार हा रदद् करणे बाबत कार्यवाही करण्याचा अधिकार मालकी ग्रंथालयास राहिल .

वरील प्रमाणे आम्ही आंतर ग्रंथालयीन देवाण - घेवाण करार करीत असून सर्व अटी व शर्ती आम्हास मान्य आहे . तसेच त्यांचे पालन करण्याची आम्ही ग्वाही देत आहोत.

ग्रंथपाल
ग्रंथपाल
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय, हिंगोली.

प्राचार्य
प्राचार्य
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय हिंगोली ४३१५१३